२३८

# इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.

## —:हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक ४३०।वे १८० (४४८६)

ग्रंथ नाम ज्ञानेश्वरी

विषय म० वेदांत

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

इदं पुस्तकं ज्ञानेश्वरीनी कीमंत रु पैसा १८ अठारनी छे संके १८ छे

॥॥॥॥॥॥॥॥॥ ॥ ज्ञानेश्वरी ॥

रा. गोपालराव हरी देशमुख अमदाबाद नं ५

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

॥श्रीगणेशायनमः॥ ॥श्रीसरस्वत्यैनमः॥ ॥जयतिसिंधुरवदनोदेवो॥य
त्पादपंकजस्मरणं॥वासरमणिरिवतमसां॥राशिंनाशयतिविघ्नानां॥१॥अ
ग्निसोमगुरुत्मकाञ्चनमयींबिंदुस्त्वनेत्रांतकं॥भास्वद्बुद्धमथाग्निरवांघ्रियुग
लंपार्श्वस्यत्र्यानने॥उद्यद्भानुसहस्रकोटिसदृशंअंतर्बहिर्व्यापिनी॥हृ
द्ब्रह्महृदांबुजोकुटिलिनीध्यायेत्सदाभावयेत्॥२॥महद्वारिर्जगतांनाथस्त्रि
पुरारिर्जगद्गुरुः॥मणिद्युम्नमहालसाकांतंवंदेस्वकुलदैवतं॥३॥आदिनाथाय
देवायनमोमत्स्येंद्ररूपिणे॥गोरक्षप्रभवेगैनिनाथायास्मैनिहृत्तये॥४॥प
रंब्रह्मपरंधामसविसाचितविग्रहं॥ज्ञानेश्वरमितिख्यातंप्रणमामिगुरुंप
रं॥५॥ज्ञानेशोभगवान्विष्णुर्निवृत्तिर्भगवान्हरः॥सोपानोभगवान्ब्र
ह्मामुक्ताख्याब्रह्मणःकला॥६॥जन्माद्यस्ययतोन्वयादितरतश्चार्थेष्वभि
ज्ञःस्वराट्तेनेब्रह्महृदायआदिकवयेमुह्यंतियत्सूरयः॥तेजोवारिमृदां

यथादिनिमयेयत्रत्रिसर्गोम्रषाधाम्नास्वेनसदानिरस्तकुहकंसत्यंपरंधीमहि
॥७॥पार्थायप्रतिबोधितांभगवतानारायणेनस्वयंव्यासेनग्रथितांपुराणमु
निनामध्येमहाभारते॥अद्वैतामृतवर्षिणींभगवतीमष्टादशाध्यायिनीमंब
त्वामनुसंदधामिभगवद्गीतेभवद्वेषिणीं॥८॥नमोस्तुतेव्यासविशालबुद्धेफु
ल्लारविंदायतपत्रनेत्र॥येनत्वयाभारततैलपूर्णःप्रज्वालितोज्ञानमयःप्रदी
पः॥९॥प्रपन्नपारिजातायतोत्रवेत्रैकपाणये॥ज्ञानमुद्रायकृष्णायगीतामृतदु
हेनमः॥१०॥सर्वोपनिषदोगावोदोग्धागोपालनंदनः॥पार्थोवत्सःसुधीर्भो
क्तादुग्धंगीतामृतंमहत्॥११॥वसुदेवसुतंदेवंकंसचाणूरमर्दनं॥देवकीपर
मानंदंकृष्णंवंदेजगद्गुरुं॥१२॥भीष्मद्रोणतटाजयद्रथजलागांधारनीलोत्प
लाःशल्यग्राहवतीकृपेणवहिनाकर्णेनवेलाकुला॥अश्वत्थामविकर्णघोर
मकरा॥दुर्योधनावर्तिनीसोत्तीर्णैखलुपेडवैरणनदीकेवर्तकःकेशवः॥१३॥

(५)

पाराशर्य्यवचःसरोजममलंगीतार्थगंधोत्कटंनानाख्यानककेशरंहरिकथा
संबोधनाबोधितं॥लोकेसज्जनषट्पदैरहरहःपेपीयमानंमुदाभूयाद्भार
तपंकजंकलिमलप्रध्वंसिनःश्रेयसे॥१४॥यंब्रह्मावरुणेंद्ररुद्रमरुतस्तुन्विं
तिंदिव्यैस्तवैर्वेदैःसांगपदक्रमोपनिषदैर्गायंतियंसामगाः॥ध्यानावस्थितत
द्गतेनमनसापश्यंतियंयोगिनोयस्यांतंनविदुःसुरासुरगणादेवायतस्मैन
मः॥१५॥मूकंकरोतिवाचालंपंगुंलंघयतेगिरिं॥यत्कृपातमहंवंदेपरमानं
दमाधवं॥१६॥सारथ्यमर्जुनस्यादौकुर्वन्गीतामृतंददौ॥लोकपरोपकारा
यतस्मैकृष्णात्मनेनमः॥१७॥श्रीमद्गीतारूपीव्यासछंदोनानाविधाश्रति॥देव
तादेवकीपुत्रोमोक्षार्थेचनियुज्यते॥१८॥ ॥इतिध्यानं॥ ॥हरिॐ॥ ॥ २
ॐनमःश्रीआद्या॥वेदप्रतिपाद्या॥जयस्वसंवेद्या॥आत्मरूपा॥१॥देवात्वचिग
णेश॥सकलार्थप्रकाश॥म्हणेनिवृत्तिदास॥अवधारिजोजी॥२॥हेशब्दब्रह्म

अशेष ॥ तेचि मूर्त्ति सुवेश ॥ तेथ वर्णवपु निर्दोष ॥ मिरवत असे ॥३॥ स्मृति तेचि
अवयव ॥ देखा आंगीक भाव ॥ तेथ लावण्याची ठेव ॥ अर्थशोभा ॥४॥ अष्टाद
शपुराणें ॥ तेचि मणिभूषणे ॥ पदपद्धति खेवणे ॥ प्रमेयरत्नाची ॥५॥ पदबंध
नागर ॥ तेचि रंगाथिलें अंबर ॥ जेथ साहित्य वाणे सपुर ॥ उज्जाळाचें ॥६॥ देखा
काव्यनाटका ॥ जें निरधारितां सकौतुका ॥ त्याचि रुणझुणति क्षुद्रघंटिका ॥ अ
र्थध्वनी ॥७॥ नानाप्रमेयांचि परी ॥ निपुणपणें पाहतां कुसरी ॥ दिसती उचित
पदें माझारीं ॥ रत्नें भलीं ॥८॥ तेथ व्यासादिकांचिया मति ॥ तेचि मेखळा मिरवती
॥ चोखालपणें झळकति ॥ पल्लवसउका ॥९॥ देखा षड्दर्शनें म्हणिपति ॥ तेचि
भूजांचि आकृति ॥ म्हणउनि विसंवादें धरिति ॥ आयुधे हाति ॥१०॥ तरि तर्क तो
चि फरशु ॥ नीतिभेद अंकुश ॥ वेदांत तो महारस ॥ मोदक मिरवे ॥११॥ एके हाती
दंत ॥ जो स्वभावता खंडित ॥ तो बौद्धमत संकेत ॥ वार्त्तिकांचा ॥१२॥ मग सहजें स

Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan

(6)

ल्कारवाद॥तोपद्मकरवरद॥धर्मप्रतिष्ठातोसिद्ध॥अभयहस्त॥१३॥देखाविवे
कवंतसुविमळ॥तोचिशुंडादंडसरळ॥जेथपरमानंदकवळ॥महासुखा
चा॥१४॥तरिसंवादतोचिदशन॥जोसमताशुभ्रवर्ण॥देवउन्मेषसूक्ष्मेक्षण
॥विघ्नराज॥१५॥मजअवगमलियादोनी॥मिमांसाश्रवणस्थानी॥बोधमदा
मृतमुनी॥अळिसेविती॥१६॥प्रमेयप्रवाळसुप्रभ॥द्वैताद्वैततेचिनिकुंभ
॥सरिसेयेकवटतीइभ॥मस्तकावरी॥१७॥उपरिवेदोपनिषदें॥जियेंउदा
रेंज्ञानमकरंदें॥तियेंकुसुमेंमुकुटीसुगंधें॥शोभतिभालिं॥१८॥अकार
चरणयुगल॥उकारउदरविशाळ॥मकारमहामंडळ॥मस्तकाकारें॥१९॥
हेतिन्हीयेकवटलें॥तेथशब्दब्रह्मकवळलें॥तेम्यांश्रीगुरुकृपानमिळें॥आ ३
दिबीज॥२०॥आतांअभिनववाग्विलासिनी॥जेचातुर्यार्थकळाकामिनी॥
तेशारदाविश्वमोहिनी॥नमिलीमियां॥२१॥मजहृदयींसद्गुरु॥जेणेतारि

Rajwade Sanshodhan Mandal Dhule and the eGangotri ... Mumbai

लोहा संसारपुरु ॥ म्हणौनि विशेषें अत्यादरु ॥ विवेका वरी ॥२२॥ जैसे डोळयां अं
जन भेटे ॥ ते वेळीं दृष्टीसि फाहाट फुटे ॥ मग वास पाहिजे तेथ प्रकटे ॥ महानि
धी ॥२३॥ कां चिंतामणि आलियां हातीं ॥ सदा विजयवृत्ति मनोरथीं ॥ तैसा मी पू
र्णकाम श्रीनिवृत्ति ॥ ज्ञानदेव म्हणे ॥२४॥ म्हणौनि जाणते निगुरु भजिजे ॥ ते
णें कृतकार्य होईजे ॥ जैसें मूळ सिंचनीं सहजें ॥ शाखापल्लव संतोषती ॥२५
॥ कां तीर्थें जियें त्रिभुवनीं ॥ तियें घडति समुद्रावगाहनीं ॥ नातरि अम्रृत रसा
स्वादनीं ॥ रस सकळ ॥२६॥ तैसा पुडतपुडतीं तोचि ॥ मियां अभिवंदिला श्री
गुरुची ॥ अभिलाषीत मनोरुची ॥ पुरविता तो ॥२७॥ आतां अवधारा क
था गहन ॥ जे सकळां कथा जन्मस्थान ॥ किं अभिनउ द्यान ॥ विवेकतरूचें ॥
२८॥ नातरि सर्वसुखाची आदी ॥ जे प्रमेय महानिधी ॥ नाना नवरससुधाब्धी
॥ परिपूर्ण हे ॥२९॥ किं परमधाम प्रकट ॥ हें विद्याचे मूळपीठ ॥ शास्त्रजातां

विशिष्ट॥अशेषांचें॥३०॥नातरिसकळधर्मांचेंमाहेर॥सज्जनांचेंजिव्हार॥
लावण्यरत्नभांडार॥शारदेचें॥३१॥नानाकथारूपेंभारती॥प्रकटलीअसे
त्रिजगती॥आविष्करोनिमहामति॥व्यासाचिये॥३२॥म्हणउनिहाकाव्यारा
वो॥ग्रंथगरुवतिचाठावो॥येथूनिरसांजालाआवो॥रसाळपणाचा॥३३
॥तेवीचिऐकाआणीकयेक॥येथूनिशब्दश्रीसछास्त्रिक॥आणिमहाबोधि
कें वळिक॥दुणावली॥३४॥येथचातुर्यशहाणेंजालें॥प्रमेयरुचीसिआ
लें॥आणिसौभाग्यपोषलें॥सुखाचेंयेथ॥३५॥माधुर्यीमधुरता॥शृंगारीसु
रेखता॥रूढपणउचिता॥दिसेभलें॥३६॥येथकळाविदपणकळा॥पुण्यासि
प्रतापआगळा॥म्हणोनिजनमेजयाचेअवलिळा॥दोषहरलें॥३७॥आणी ४
पाहतांनावेक॥रंगींसुरंगतेचिआगळिक॥गुणासगुणपणाचेंबिक॥बहु
वसयेथ॥३८॥भानुचेनितेजेंधवळें॥जैसेंत्रैलोक्यदिसेउजळें॥तैसेंव्यास

मतिकवळलें॥मिरवेविश्व॥३९॥कांसुक्षेत्रींबीजघातलें॥तेंआपलांपरीवि
स्तारलें॥तेसेंभारतीसुरवाडलें॥अर्थतात॥४०॥नातरिनगरांतरिंवसिजें॥
तरिनागरांचिहोईजे॥तैसेंव्यासोक्तितेजें॥धवळीतसकळ॥४१॥किंप्रथम
वयसाकाळिं॥लावण्याचीनव्हाळी॥प्रगटेजैसीआगळी॥अंगनाआंगीं॥
४२॥नातरीउद्यानींमाधवीघडे॥तेथेंवनशोभेचीखाणीउघडे॥आदिला
पासूनिअपाडें॥जियापरी॥४३॥नानाघनीभूतसुवर्ण॥जैसेंन्याहाळितांसा
धारण॥मगअळंकारींबरवेंपण॥निवाडदावी॥४४॥तैसेंव्यासोक्तिअळंका
रलें॥आवडेतेंबरवेपणपातलें॥तेंजाणोनिकाईंआश्रयिलें॥इतिहासीं॥
४५॥नानाप्रतीतियेप्रतिष्ठेलागीं॥सानीवधरूनिआंगीं॥पुराणेंआख्यान
रूपेंजगीं॥भारताआलीं॥४६॥म्हणोनिमहाभारतिंनाहीं॥तेंनोहेचिलोकी
तिहीं॥येणेंकारणेंम्हणिपेपांहीं॥व्यासोच्छिष्टजगंत्रय॥४७॥ऐसीसुरसजगीं

Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan ... Mumbai

कथा॥जेजन्मभूमिपरमार्थां॥मुनिसांगेनृपनाथा॥जनमेजया॥४८॥जेअद्वि
तीयउत्तम॥पवित्रैकनिरुपम॥परममंगळधाम॥अवधारिजो॥४९॥आतां
भारतकमळपरागु॥गीताख्यप्रसंगु॥जोसंवादलाश्रीरंगु॥अर्जुनेसी॥५०
॥नातरीशब्दब्रह्माब्धी॥मथियलेंव्यासबुद्धी॥निवडिलेंनिरवधी॥नवनीत
हें॥५१॥मगज्ञानाग्निसंपर्कें॥कडसिलेंविवेकें॥पदआलेंपरिपाकें॥आमो
दासी॥५२॥जेंअपेक्षिजेविरक्तीं॥सदाअनुभविजेसंतीं॥सोहंभावेंपारंग
तीं॥रमिजेजेथें॥५३॥जेंआकर्णिजेभक्तीं॥जेंआद्यवंद्यत्रिजगतीं॥तेभीष्म
पर्विंसंगती॥सांगिजेल॥५४॥जेभगवद्गीताम्हणिजे॥जेब्रह्मेशानिप्रसंशिजे
॥जेसनकादिकिंसेविजे॥आदरेंसि॥५५॥जैसेंशारदीयेचेंचंद्रकळे॥मांजि ५
अमृतकणकोवळे॥तेवेंचितिमनमवाळें॥चकोरतलगें॥५६॥तियापरीश्रो
तां॥अनुभवावीहेकथा॥अतिहळुवारपणचित्ता॥आणूनियां॥५७॥हेशब्दें

वीणसंवादिजे ॥ इंद्रियांनेण तां भोगिजे ॥ बोला आदिं स्रोंबिजे ॥ प्रमेयासी ॥ ५८
॥ जैसें भ्रमर पराग नेनति ॥ परि कमळदळें नेणति ॥ तैसी परी आहे सेविती ॥ ग्रंथी
इये ॥ ५९ ॥ कां आपला ठाय न सांडितां ॥ आलिंगिजे चंद्र प्रकटतां ॥ हा अनुरा
गभोगितां ॥ कुमुदिनी जाणे ॥ ६० ॥ ऐसेनि गंभीरपणें ॥ स्थिरावलेनि अंतःकरणें
॥ आथिला तोचि जाणें ॥ मानुइये ॥ ६१ ॥ अहो अर्जुनाचिये पांति ॥ जे परिसणया
योग्य होति ॥ तिंही कृपा करूनि संति ॥ अवधान द्यावें ॥ ६२ ॥ हे सलगी म्यां म्ह
णितलें ॥ चरणा लागोनि विनविलें ॥ प्रभु सखोल हृदय आपुलें ॥ म्हणोनियां ॥
६३ ॥ जैसा स्वभाव मायबापाचा ॥ अपत्य बोले जरि बोबडें बाचा ॥ तरि अधीक
तयाचा ॥ संतोषचि आथी ॥ ६४ ॥ तैसा तुह्मी मी अंगिकारिला ॥ सज्जनी आपला
म्हणीतला ॥ तरि उणें सहजें उपसाहाला ॥ प्रार्थुं काय ॥ ६५ ॥ परि अपराध तो
आणीक आहे ॥ जें मी गीतार्थ कवळुं पाहे ॥ ते अवधारा विनउला हें ॥ म्हणउनि

यं॥६६॥हें अनावरन विचारितां॥वायां विधिवंसा उपनला चित्ता॥येऱ्हवीं का
य भानुतेजीं खद्योता॥शोभा आथी॥६७॥किं टिटिभु चांचुवरी॥माप सुये साग
रीं॥मी नेणतु त्यापरी॥प्रवर्तें येथ॥६८॥आइका आकाश गिवसावें॥तरि आ
णीक त्याहूनी थोर होआवें॥म्हणौनि अपाडु हें आघवें॥निरधारितां॥६९॥यागी
ताथीची थोरी॥स्वयें शंभु विवरी॥जेथ भवानी प्रश्न करी॥चमत्कारोनि॥७०॥
तेथें हर म्हणे नेणिजे॥देवी जैसें कां स्वरूप तुझें॥तैसें नित्य नूतन देखिजे॥गी
तातत्व॥७१॥हा वेदार्थसागरु॥जया निद्रिता घोरु॥तो स्वयें श्रीसर्वेश्वरु॥प्रत्य
क्ष अनुवादला॥७२॥ऐसें जें अगाध॥जेथ वेडावती वेद॥तेथ अल्प मी मतिमं
द॥काय होयें॥७३॥हें अपार कैसेनि कवळावें॥महातेज कवणें धवळावें॥ग ६
गन मुठी सुवावें॥मशकें केवीं॥७४॥परि येथ असे एकु आधारु॥तेणेंचि बोलें
मी सधरु॥जे सानुकूळ श्रीगुरु॥ज्ञानदेव म्हणे॥७५॥येऱ्हवीं तऱ्हीं मी मूर्खु॥ज

B

होंज्ञालाअविवेक॥तऱ्हीसंतकृपादीपकु॥स्त्रज्वळअसे॥७६॥लोहाचेंक
नकहोये॥हेंसामर्थ्यपरिसाचिआहे॥कांम्रतहीजीवितलाहे॥अम्रतसिद्धी
॥७७॥जरीप्रगटेसिद्धसरस्वती॥तरिमुकयाआथीभारति॥येथवस्तुसामर्थ्य
शक्ति॥नवलकांई॥७८॥जयातेकामधेनुमाये॥तयाअप्राप्यकांहीआहे॥म्ह
णोनिमीप्रवर्त्तोलाहें॥ग्रंथीइये॥७९॥तरिन्यूनतेपुरतें॥अधीकतेंसरतें॥क
रुनिघ्यावेहेतुमतें॥विनवीतअसे॥८०॥आतांदेइजेअवधान॥तुह्मीबोल
विलामीबोलेन॥जेसेंचेष्टेसूत्राधीन॥दारुयंत्र॥८१॥तैसामीअनुग्रहित॥
साधूंचानिरूपित॥तेआपलाअलंकारित॥भलतयापरी॥८२॥तवंश्रीगुरु
म्हणतीराहीं॥हेंतुजबोलावेनलगेकांहीं॥आतांग्रंथाचित्तदेइं॥सउकरीवे
गा॥८३॥याबोलानिवृत्तिदास॥पावोनिपरमउल्हास॥म्हणेपरिसामनाअ
वकाश॥देउनियां॥८४॥ ॥श्लो०॥ ॥धृतराष्ट्रोवाच॥ ॥धर्मक्षेत्रेकु

...Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

१५

रुक्षेत्रेसमवेतायुयुत्सवः॥मामकाःपांडवाश्चैवकिमकुर्वतसंजय॥१॥टी०॥त
रिपुत्रस्नेहेमोहित॥धृतराष्ट्रअसेपुसत॥म्हणेसंजयासांगेमात॥धर्मक्षेत्रेति
॥कुरुक्षेत्रेत्रिंचिं॥८५॥जेधमोळयम्हणिजे॥मामकाःपांडवाश्चैव॥तेथपांडव
आणीमासे॥समवेतायुयुत्सवः॥गेलाअसतिव्याजें॥जुंझाचेनि॥८६॥किम
कुर्वतसंजय॥तरितिहींयेतुला॥अवसरीं॥कायकीजतअसेयेरयेरीं॥तेम्
उकरीकथनकरिं॥मजप्रति॥८७॥श्लो०॥संजयउवाच॥दृष्ट्वातुपांडवानीकं
व्यूढंदुर्योधनस्तदा॥आचार्यमुपसंगम्यराजावचनमब्रवीत्॥२॥पश्यैतांपां
डुपुत्राणामाचार्यमहतींचमूं॥व्यूढांद्रुपदपुत्रेणतवशिष्येणधीमता॥३॥
टी०॥पांडवानीकं॥व्यूढंदुर्योधनस्तदा॥तेवेळींसंजयबोले॥म्हणेपांडवसेन्यउ ७
चलले॥जैसेंमहाप्रळेंपसरले॥कृतांतमुख॥८८॥तैसेंतेयनदाट॥उठावले
एकवाट॥जैसेंउसळलेंकाळकूट॥धरीकवण॥८९॥नातरिवडवानळसांदुक

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

ळा॥प्रळयवातेंपोखला॥सागरशोषूनिउधवला॥अंबरासी॥९०॥तैसेदळ
दुर्धर॥नानाव्यूहींपरिकर॥अवगमलेंभयासुर॥तियेकाळिं॥९१॥दृष्ट्वातु॥तेदे
खिलियांदुर्योधनें॥अव्हेरिलेंकवणेमानें॥जैसेंनगणिजेपंचाननें॥गजघ
टातें॥९२॥आचार्यमित्यब्रुं॥मगद्रोणापासिंआला॥तयातेंम्हणें॥पश्येत्यब्रुं
॥हादेखिला॥कैसादळभारउचलला॥पांडवांचा॥९३॥गिरिदुर्गजैसेंचाल
ते॥व्यूढामित्यब्रुं॥विविधव्यूहभगवंते॥रचिलेआथीबुद्धिमंते॥द्रुपदकुम
रें॥९४॥जोकांतुम्हींशिष्यआपला॥विद्यादेउनिकुरुठाकेला॥तेणेंहासैन्य
सिंहपाखरिला॥देखदेख॥९५॥श्लो०॥अत्रशूरामहेष्वासाभीमार्जुनसमा
युधि॥युयुधानोविराटश्चद्रुपदश्चमहारथः॥४॥टी०॥अत्रेत्यब्रुं॥आणीक
हीअसाधारण॥जेशस्त्रास्त्रीप्रवीण॥क्षात्रधर्मीनिपुण॥वीरआहाति॥९६॥
जेबळेंप्रौढीपौरुषें॥भीमार्जुनासारिखे॥तेसांगेनकौतुकें॥प्रसंगेचि॥९७॥

युयुधानरत्क्षत्रराई॥येथप्रधानसुभट॥आलाअसेविराट॥महारथीश्रेष्ट
द्रुपदवीर॥९८॥श्लो०॥धृष्टकेतुश्चेकितानःकाशीराजश्चवीर्यवान्॥पुरुजित्
कुंतिभोजश्चशैब्यश्चनरपुंगवः॥५॥युधामन्युश्चविक्रांतउत्तमोजाश्चवीर्यवा
न्॥सौभद्रोद्रौपदेयाश्चसर्वएवमहारथाः॥६॥टी०॥धृष्टकेतुरितिस्पष्टमन्य
त॥चेकितानधृष्टकेत॥काशीराजविक्रांत॥उत्तमोजानृपनाथ॥शैब्यदेख
॥९९॥हाकुंतीभोजपाहें॥येथयुधामन्युआलाआहे॥आणिपुरुजितादिराय
हे॥सकळदेख॥१००॥हासुभद्राहृदयनंदन॥जोअपरनवाअर्जुन॥तोअ
भिमन्युम्हणेदुर्योधन॥देखेंद्रोणा॥१॥आणीकहाद्रुपदीकुमर॥हेसकळही
महारथीवीर॥मितिनेणिजेपरिअपार॥मिनलेअसति॥२॥श्लो०॥अस्माकं ८
तुविशिष्टायेतान्निबोधद्विजोत्तम॥नायकाममसैन्यस्यसंज्ञार्थंतान्ब्रवीमिते
॥७॥भवान्भीष्मश्चकर्णश्चकृपश्चसमितिंजयः॥अश्वत्थामाविकर्णश्चसौम

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

वात॥ यादोघांजैसा संगात॥ तैसा हा गंगासुत॥ सेनापती॥१८॥ आतां येणेंसिंक
वणंभिंडे॥ अपर्याप्तंतत्॥ हें पांडवसैन्य कीर थोडें॥ वरि रचिलें निपाडें॥ दिसत
असे॥१९॥ तेषामिति॥ वरि भीमसेन तेथ॥ तो जाला असे सेनानाथ॥ ऐसे बोलो
नि हे मात॥ सांडिली तेणें॥२०॥ श्लो०॥ अयनेषु च सर्वेषु यथाभागमवस्थिताः॥
भीष्ममेवाभिरक्षंतु भवंतः सर्वएव हि॥११॥ टी०॥ अयनेष्विति॥ मग पुनरपि काय
बोलें॥ सकळसैंनिकां तें म्हणीतलें॥ आतां दळभार आपलाले॥ सरिसे करा॥२१
॥ ज्याज्या अक्षोहिणी॥ तेणें तियाचरणी॥ वरगण करणी॥ महारथी यां॥२२
॥ तेणें तें आवरिजे॥ भीष्मातळि राहिजे॥ भवंतःसर्वएवहि॥ द्रोणा तें म्हणें पाहि
जे॥ तुम्हीं सकळ॥२३॥ भीष्ममेवाभिरक्षंतु॥ हाचि येकु रक्षावा॥ मी तेसा देखा
वा॥ म्हणे दळभार आघवा॥ साचआमचा॥२४॥ श्लो०॥ तस्य संजनयन्हर्षं
कुरुवृद्धः पितामहः॥ सिंहनादं विनद्योच्चैः शंखं दध्मौ प्रतापवान्॥१२॥ टी०॥

Joint project of The Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(18)

तस्येत्यर्ध॥ या राज याचया बोला॥ सेनापति संतोषला॥ सिंहनादं विनद्योच्चैः॥
म गतेणें केला॥ सिंहनाद॥२५॥ तो गाजत असे अद्भुत॥ दोहीं सैन्यांआंत॥ प्रति
ध्वनि न समात॥ उपजत असे॥ २६॥ शंखं दध्मौ प्रतापवान्॥ तयाचि तुलगा सवें
॥ वीर हृत्ति चे निघावें॥ दिव्य शंख भीष्म देवें॥ आस्फुरिला॥२७॥ ते दोन्ही नाद मिन
ले॥ तेथ त्रैलोक्य बधीर भूत झाले॥ जैसे आकाश कोंपडिलें॥ तुटोनिया॥ २८॥
घडघडीत अंबर॥ उचंबलत सागर॥ क्षोभले चराचर॥ कांपत असे॥ २९॥ ते
णें महाघोष गजरें॥ दुमदुमिति गिरिकंदरें॥ तवं दळामाजि रणतुरें॥ आस्फुरि
लीं॥३०॥ श्लो०॥ ततः शंखाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः॥ सहसैवाभ्यहन्यंत
स शब्दस्तुमलोभवत्॥१३॥ टी०॥ तत इति॥ उदंडे सैघ वाजतें॥ भयानकें खोखा
इलें॥ महाप्रळय जेथें॥ धाकडासि॥३१॥ भेरी निशाण मादळ॥ शंख काहाला
भोगळ॥ सहसै वेति॥ आणि भयासुर रणकोल्हाळ॥ सुभटांचे॥३२॥ आवेशो 10

(१९)

दत्तिस्तथैव च ॥८॥ टी० ॥ अस्माकंमिति ॥ आतां आमुचा दळीनायक ॥ जे रूढवी
रसैनिक ॥ ते प्रसंगें आरक ॥ सांगिजति ॥३॥ संज्ञार्थमिति ॥ उद्देशें एक दोनी ॥ ज्या
इजति बोलोनि ॥ भवानित्यर्ह ॥ तुह्मी आदि करुनि ॥ मुख्य जे जे ॥४॥ हा भीष्मगं
गानंदनु ॥ जो प्रतापतेजस्वी भानु ॥ रिपुगजपंचाननु ॥ कर्णवीर ॥५॥ एके काचे
नि मनोव्यापारें ॥ हे विश्व होय संहरे ॥ हा कृपाचार्य न पुरे ॥ एकलाची ॥६॥ अश्व
त्थामेत्यर्ह ॥ येथ विकर्णवीर आहे ॥ हा अश्वत्थामा पैल पाहें ॥ याचा आउदरस
दा वाहे ॥ कृतांत मनीं ॥७॥ समितिंजय सौमदत्ति ॥ श्लो० ॥ अन्ये च बहवः शूरा म
दर्थे त्यक्तजीविताः ॥ नानाशस्त्रप्रहरणाः सर्वे युद्धविशारदाः ॥९॥ टी० ॥ अन्येच
बहवः शूरा ॥ ऐसे आणी कहीं बहुत आहाति ॥ ज्यांचिया बळामिति ॥ धाताने
णे ॥८॥ नाना शस्त्रप्रहरणाः ॥ जे शास्त्रविद्यापारंगत ॥ मंत्रावतार मूर्ती ॥ हे कां
जें अस्त्रजात ॥ येथूनि रूढ ॥९॥ हे अप्रतिमल्ल जगीं ॥ प्रतापअंगीं ॥ मद

"Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

## मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

---

**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८
**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com